# २०. क्षयरोग : समक्ष उपचार पद्धतीचा गोषवारा (DOT)

(राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम)

| | क्षयरोगाचा प्रकार (प्रवर्ग) | उपचारांचा तपशील | | एकूण उपचाराचा काळ | बेडका तपासणी कधी कधी करायची? @ |
|---|---|---|---|---|---|
| | | सर्वकष उपचार कालावधी (IP) | निरंतर उपचार (CP) | | |
| लाल खोके | १) सर्व नवीन सापडलेले 'जंतुयुक्त बेडका' नसलेले गंभीर रुग्ण. | २ महिने HRZE आठवड्यातून ३ दिवस<br>२ महिन्याअखेर बेडका जंतुयुक्त आढळला तर हाच उपचार आणखी महिनाभर लांबवा | ४ महिने RH आठवड्यातून ३ वेळा | ६ महिने किंवा ७ महिने | २,४,६, व्या महिन्यांच्या शेवटी |
| निळे खोके | २) जुन्या रुग्णांना फेरउपचार | २ महिने SHRZE त्यानंतर १ महिना RHZE. सर्व उपचार आठवड्यातून ३ दिवस देणे | ५ महिने RHE आठवड्यातून ३ वेळा | ८महिने | ३,५,८ महिन्याच्या शेवटी *** |
| हिरवे खोके | ३) गंभीर नसलेले 'जंतुरहित बेडका' रुग्ण किंवा फुप्फुसाखेरीजच इतर अवयवांचा क्षयरोग | २ महिने RHZ आठवड्यातून ३ वेळा | ४ महिने RH आठवड्यातून ३ वेळा | ६ महिने | २ ऱ्या व ४थ्या महिन्याअखेर **** |

* या टप्प्यातील सर्व उपचार समक्ष द्यायचे आहेत.

** या टप्प्यात दर आठवड्यास/पंधरवडयास एकदा समक्ष, उरलेले उपचार घरी.

*** शेवटची बेडका तपासणी जंतुयुक्त आल्यास प्रदीर्घ उपचार आवश्यक

.**** शेवटची बेडका तपासणी जंतुयुक्त आल्यास प्रवर्ग २ मध्ये घालून नव्याने उपचार करावे.

@पहिली बेडका तपासणी ३ नमुन्यांची मिळून (लगोलग, रात्रभर जमा केलेली, त्यानंतर लगेच). नंतरच्या तपासण्या २ नमुन्यांच्या मिळून